गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १४५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जनतेचा विश्वास सार्थ ठरवून नवनिर्वाचित नगरसेवकांनी आश्वासनांची पूर्तता करा - रावसाहेब दानवे

## जालन्यात ४१ नवनिर्वाचित नगरसेवकांचा 'चित्रकूट'वर भव्य सत्कार; भास्कर दानवे यांचा पुढाकार









**जालना । विशेष प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने मिळवलेला दणदणीत विजय हा पक्षसंघटना, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमांचा परिणाम आहे. जनतेने मोठ्या विश्वासाने निवडून दिलेल्या नवनिर्वाचित नगरसेवकांनी आता आपल्या प्रभागातील विकासकामांकडे प्राधान्याने लक्ष द्यावे. निवडणूक काळात जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे हेच त्यांचे पहिले कर्तव्य असावे, असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री मा. श्री. रावसाहेब पाटील दानवे यांनी केले.

जालना महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांच्या पुढाकाराने जालन्यातील 'चित्रकूट' निवासस्थानी नवनिर्वाचित नगरसेवकांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात भारतीय जनता पार्टीने लढवलेल्या ६५ जागांपैकी वजियी झालेल्या ४१ नगरसेवकांचा सन्मान चिन्ह,शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला.

विशेष बाब म्हणजे, भास्कर आबा दानवे यांनी केवळ वजियी नगरसेवकांचाच नव्हे, तर पराभूत झालेल्या २४ उमेदवारांचाही शाल,एम व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. ''पक्षाच्या विजयात प्रत्येक कार्यकर्त्याचे आणि उमेदवाराचे योगदान महत्त्वाचे आहे,'' असे त्यांनी यावेळी नमूद केले.

सत्काराला उत्तर देताना जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले, ''निवडून येणे ही केवळ सुरुवात आहे. खरे काम आता सुरू झाले आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सर्व नगरसेवकांनी प्रामाणिकपणे, एकजुटीने काम करावे.''

या प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, रामेश्वर भांदर्गे, बद्रीनाथ पठाडे, सौ. विमलताई आगलावे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, धनराज काबलिये, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ. शुभांगी देशपांडे, सरचिटणीस अमोल कारंजेकर, वसंत शिंदे, सुनील पवार, अर्जुन गेही यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## जालना महानगरपालिका: स्वीकृत सदस्य निवडीवरून राजकीय खलबतं

# नाकारलेल्या उमेदवारांची फिल्डिंग, की तज्ज्ञांना संधी?

**जालना । प्रतिनिधी -** महानगरपालिकेच्या निवडणुकीचा धुराळा खाली बसल्यानंतर आता सर्वांचे लक्ष स्वीकृत सदस्य निवडीकडे लागले आहे. महापालिकेत आपल्या पक्षाचे संख्याबळ वाढवण्यासाठी आणि निष्ठावंतांचे पुनर्वसन करण्यासाठी राजकीय पक्षांनी हालचाली सुरू केल्या आहेत. मात्र, यामध्ये एक धक्कादायक कल पाहायला मिळत आहे; ज्या उमेदवारांना प्रत्यक्ष निवडणुकीत मतदारांनी नाकारले, तेच आता चोरवाटेने सभागृहात शिरण्यासाठी जोरदार फिल्डिंग लावत आहेत.

या पार्श्वभूमीवर, जनसामान्यांतून एकच सूर उमटत आहे: ''ज्यांना मतदारांनी नाकारले, त्यांना पुन्हा संधी का?'' त्याऐवजी समाजातील प्रबुद्ध घटक जसे की डॉक्टर, वकील, प्राध्यापक आणि पत्रकारांना संधी देऊन शहराच्या विकासाचा दर्जा उंचावावा, अशी मागणी जोर धरत आहे.

काय सांगतो स्वीकृत सदस्यांबाबतचा कायदा?

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार, महापालिकेत स्वीकृत सदस्यांची नियुक्ती केली जाते. या निवडीमागे मूळ हेतू हा आहे की, जे तज्ज्ञ व्यक्ती निवडणुकीच्या राजकारणात पडू शकत नाहीत, परंतु त्यांच्या ज्ञानाचा शहराला फायदा होऊ शकतो, अशांना प्रशासनात सामावून घेणे.

निवडीचे मुख्य निकष:

संख्याबळानुसार जागा: राजकीय पक्षांच्या निवडून आलेल्या नगरसेवकांच्या संख्येच्या प्रमाणात (प्रमाणशीर प्रतिनिधित्व) स्वीकृत सदस्यांच्या जागा वाटून दिल्या जातात.

पात्रता: उमेदवाराकडे महापालिका प्रशासनाचा अनुभव असावा किंवा तो डॉक्टर, वकील, सनदी लेखापाल (), अभियंता किंवा शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ असावा.

नोंदणीकृत संस्थांमधील अनुभव: सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या नोंदणीकृत संस्थांमधील कामाचा अनुभव असलेल्या व्यक्तींचाही यात विचार होऊ शकतो.

पराभूतांची फिल्डिंग आणि लोकशाहीचा पेच

जालन्यात सध्या चित्र असे आहे की, निवडणुकीत पराभूत झालेले अनेक दिग्गज नेते आता आपल्या पक्षाच्या प्रमुखांकडे स्वीकृत सदस्यत्वासाठी साकडे घालत आहेत.

यामुळे निर्माण होणारे प्रश्न:

जनमताचा अनादर: जर मतदारांनी एखाद्या व्यक्तीला नाकारले असेल, तर त्याच व्यक्तीला मागील दाराने सभागृहात पाठवणे हा लोकशाहीचा आणि मतदारांचा अपमान ठरतो.

तज्ज्ञांची उपेक्षा: जर राजकीय पुनर्वसनासाठीच या जागा वापरल्या गेल्या, तर शहराच्या नियोजनात आवश्यक असणारे तांत्रिक आणि सामाजिक कौशल्य () सभागृहाला मिळणार नाही.

तज्ज्ञांच्या नियुक्तीची गरज का आहे?

शहराचा विकास केवळ रस्ते आणि नाल्यांपुरता मर्यादित नसून तो आरोग्य, शिक्षण आणि कायद्याच्या चौकटीत होणे गरजेचे आहे.

डॉक्टर: शहरातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था आणि साथीच्या आजारांचे नियंत्रण करण्यासाठी तांत्रिक सल्ला देऊ शकतात.

वकील: महापालिकेचे कायदेशीर पेच आणि नवीन पोटनियम तयार करताना त्यांची मदत होऊ शकते.

शिक्षणतज्ज्ञ: महापालिकेच्या शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि नवीन शैक्षणिक उपक्रम राबवण्यासाठी त्यांची भूमिका महत्त्वाची ठरेल.

पत्रकार: समाजातील समस्यांची जाण आणि प्रशासनातील त्रुटी मांडण्याचे कौशल्य त्यांच्याकडे असल्याने ते जनतेचा आवाज बनू शकतात.

सांगता: राजकीय पक्षांसमोर नैतिक आव्हान

जालना महानगरपालिकेच्या सत्तेच्या समीकरणात स्वीकृत सदस्यांचे मत महत्त्वाचे असते. मात्र, केवळ राजकारण न पाहता शहराच्या हितासाठी नाकारलेले चेहरे बाजूला सारून अभ्यासू चेहरे समोर आणण्याचे मोठे आव्हान सर्वच राजकीय पक्षांसमोर आहे. आता पक्षाध्यक्ष कार्यकर्त्यांच्या दबावाला बळी पडतात की जालन्याच्या विकासासाठी तज्ज्ञांना संधी देतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

स्वीकृत सदस्यांच्या निवडीबाबत लवकरच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रक्रिया पूर्ण केली जाईल. तत्पूर्वी नागरिकांनी ही मागणी लावून धरली आहे.

---

## गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या हौतात्म्य दिनानिमित्त नांदेडसाठी विशेष रेल्वे गाड्यांची घोषणा

# दिल्ली, मुंबई आणि चंदीगडवरून सुटणार विशेष रेल्वे

**नांदेड । प्रतिनिधी -** 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० शहिदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी देशभरातून येणाऱ्या भाविकांची आणि प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता रेल्वे प्रशासनाने ट्रेन ऑन डिमांड () अंतर्गत मुंबई, चंदीगड आणि दिल्ली (हजरत निजामुद्दीन) येथून नांदेडसाठी विशेष रेल्वे गाड्या चालवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

मध्य रेल्वेने प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार, उत्तर भारतातून येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी दिल्लीतील हजरत निजामुद्दीन स्थानकावरूनही २३ आणि २४ जानेवारी रोजी दुपारी १२:३० वाजता विशेष गाडी नांदेडसाठी हजरत निजामुद्दीन, पानिपत, आग्रा कॅन्ट, विरांगणा लक्ष्मीबाई झांसी, बिना, भोपाळ, इटारसी, खंडवा, भुसावळ, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, पूर्णा मार्गे दुसऱ्या दिवशी दुपारी १६.२० नांदेडला पोहोचेल .

चंदीगड ते नांदेड (गाडी क्र. ०४५२४/०४५२३) आणि हजरत निजामुद्दीन ते नांदेड (गाडी क्र. ०४४९४/०४४९३) या दोन राखीव सुपरफास्ट विशेष गाड्या चालवल्या जाणार आहेत. चंदीगडवरून २३ आणि २४ जानेवारी रोजी सकाळी ०५:४० वाजता सुटणारी गाडी अंबाला, पानिपत, दिल्ली सफदरजंग, आग्रा, विरांगणा लक्ष्मीबाई झाशी , भोपाळ, इटारसी, खंडवा, भुसावळ, जळगाव, मनमाड, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, पूर्णा मार्गे प्रवास करत दुसऱ्या दिवशी दुपारी १३:३० वाजता नांदेडला पोहोचेल. मुंबई येथून देखील विशेष रेल्वे चालविण्यात येणार आहे. लोकमान्य टिळक टर्मिनस (मुंबई) ते नांदेड दरम्यान गाडी क्र. ०१०४१/०१०४२ ही विशेष रेल्वे २३ आणि २४ जानेवारी रोजी मुंबईहून दुपारी १५:३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ०४:०० वाजता नांदेडला पोहोचेल. ही गाडी ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, औरंगाबाद, जालना आणि परभणी या स्थानकांवर थांबेल. परतीच्या प्रवासासाठी ही गाडी नांदेडवरून २४ आणि २५ जानेवारी रोजी रात्री २३:३० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी दुपारी १३:४० वाजता मुंबईला पोहोचेल. या गाडीत १८ डब्यांची रचना असून यात स्लीपर, जनरल आणि एसी कोचचा समावेश असेल.

या सर्व गाड्यांच्या नियोजनामुळे पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि महाराष्ट्रातील विविध भागांतून येणाऱ्या हजारो भाविकांना मोठा दिलासा मिळणार आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना सोशल डिस्टंसिंग आणि सॅनिटायझेशनसह सर्व आवश्यक नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले असून, गाड्यांच्या सुयोग्य संचालनासाठी संबंधित विभागांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत.

---

# खेळ व कलेच्या माध्यमातून मुलांच्या सृजनशीलतेला चालना मिळते जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** खेळ व कलेच्या माध्यमातून मुलांच्या सृजनशीलतेला चालना मिळते तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडतो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. महिला व बालविकास विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय चाचा नेहरू बालमहोत्सवाचा समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रमाप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर प्रभारी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीमती कोमल कोरे, बाल विकास प्रकल्प अधिकारी शहरी एन. डी. वामन यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, अभ्यासासोबतच खेळ, चित्रकला, संगीत, नृत्य, नाट्यकला यांसारख्या उपक्रमांमुळे मुलांमध्ये कल्पकता, आत्मविश्वास, संघभावना व नेतृत्वगुण विकसित होतात. खेळांमधून शिस्त, संयम व सहकार्याची भावना रुजते, तर कलेतून भावना व्यक्त करण्याची क्षमता वाढते.आजच्या स्पर्धात्मक युगात मुलांचा ताण कमी करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधिक असल्याचे त्यांनी नमूद केले. पालक व शिक्षकांनी मुलांच्या आवडीनिवडी ओळखून त्यांना खेळ व कलेच्या माध्यमातून स्वतःला व्यक्त करण्यासाठी संधी द्यावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी मित्तल यांनी केले.

पोलीस मुख्यालयाच्या मैदावर दिनांक १९ ते २१ जानेवारी या दरम्यान चाचा नेहरु बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात जिल्हयातील शासकीय व स्वयंसेवी बालगृहातील मुलांनी सहभाग घेतला होता. या तीन दिवसीय महोत्सवामध्ये मैदानी खेळामधे कब्बडी, १०० मी. धावणे, गोळा फ ेक, थाळी फेक, लिंबु-चमचा, पोत्यामधुन चालने तसेच इनडोअर खेळामध्ये - कॅरम, बुध्दीबळ, चित्रकला, निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच आज दिनाक २१ जानेवारी रोजी मुलांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणुन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांने एकल गायन, समूह गायन, नृत्या कला मध्ये सहभाग घेतला. या कार्यक्रमामध्ये सर्व विजेत्यांना व सहभागी विद्यार्थ्यांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.



## संपादकीय पान

# आझाद हिंद सेनेचे सरसेनापती

स्वातंत्र्य चळवळीतील थोर क्रांतिकारक नेते आझाद हिंद सेनेचे सरसेनापती सुभाषचंद्र बोस यांची उद्या म्हणजे २३ जानेवारी रोजी जयंती आहे. २३ जानेवारी १८८७ रोजी कटक येथे नेताजींचा जन्म झाला. नेताजींना आठ भावंडे होती. नेताजी लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. वयाच्या १५ वर्षीच नेताजींनी हिमालयाच्या दिशेने प्रस्थान केले. पण त्यांना गुरू दर्शन झाले नाही म्हणून त्यांनी स्वामी वविेकानंद यांचे साहित्य वाचून त्यांना गुरू बनवले. कॉलेजमध्ये असताना एका इंग्रज शिक्षकाने भारतीयांना दूषणे दिली तेंव्हा नेताजींनी उभे राहून त्या शक्षिकाला जाब विचारीत निषेध नोंदवला. इतकेच नाही तर त्या शिक्षकावर कारवाई व्हावी यासाठी कॉलेजमध्ये बंद पुकारला याचा राग मनात धरून कॉलेज प्रशासनाने त्यांना कॉलेजमधून काढून टाकले. १९२१ साली इंग्लंडला जाऊन नेताजींनी इंडियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा दिली त्यात ते चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. नेताजींनी काहीकाळ सिव्हिल सर्व्हीसमध्ये नोकरी देखील केली. पण भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी सिव्हिल सर्व्हिसच्या नोकरीवर पाणी सोडले. तेंव्हा गांधीजींची असहकार चळवळ जोरात सुरू होती. असहकार चळवळ समजून घेण्यासाठी व स्वातंत्र्य चळवळीची पुढील दिशा ठरवण्यासाठी त्यांनी गांधीजींची भेट घेतली. महात्मा गांधींनी त्यांना चित्तरंजन दास यांच्याकडे पाठवले. चित्तरंजन दास हे त्यांचे राजकीय गुरू बनले. इंग्लंडची राणी कोलकोत्याच्या दौऱ्यावर येणार आहे हे समजल्यावर नेताजींनी या दौऱ्यावर बहिष्कार टाकण्याची योजना आखली. इंग्रजांना त्याची कुणकुण लागताच त्यांनी नेताजी आणि चित्तरंजन दास यांना अटक केली. सहा महिने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगात असताना त्यांनी इतिहास, धर्मशास्त्र आणि मानसशास्त्र या विषयांचे वाचन केले. तुरुंगातून मुक्त झाल्यावर त्यांनी भारतातील राजकीय परस्थितीचा अभ्यास केला आणि ते राजकारणात सक्रिय झाले. ते बंगाल प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष बनले. पुढे त्यांनी इंडिया इंडिपेंडन्स युथ लीगची स्थापना करुन तरुणांना संघटित केले. १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या आंदोलनात नेताजींना पुन्हा अटक झाली. गांधी आयर्विन करारानंतर त्यांची मुक्तता झाली. ते कोलकोत्याचे महापौर बनले. गांधी आयर्विन कराराला नेताजींनी विरोध केला त्यामुळे त्यांचे महात्मा गांधीशी मतभेद झाले. १९३२ साली सशस्त्र क्रांतिकारी संघटनेशी संबंध जोडून त्यांना अटक करण्यात आली. पण प्रकृतीच्या कारणावरून त्यांना तुरुंगात न ठेवता देशातून हद्दपार करण्यात आले. तीन वर्ष ते व्हिएन्ना येथे राहिले. तिथे त्यांनी युरोपातील राजकीय परस्थितीचा अभ्यास केला. १९३७ साली गांधीजींच्या विरोधाला न जुमानता त्यांनी त्रिपुरा काँग्रेस अधिवेशनात अध्यक्षपदाची निवडणूक लढवली. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्यांनी पट्टाभीसीतारामय्या यांचा पराभव केला. या निवडणुकीमुळे महात्मा गांधी नाराज झाले. हा आपलाच पराभव आहे असे ते मानू लागले. बहुसंख्य काँग्रेसजनांनी गांधीजींचेच नेतृत्व मान्य केले. त्यामुळे नेताजींनी अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची स्थापना केली. नागपूर अधिवेशनात अस्थायी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. पण संकल्पित सत्यागृहापूर्वीच त्यांना अटक करण्यात आली. अटक केल्यानंतर नेताजींनी अन्नत्याग करु अशी धमकी दिली. या धमकीला घाबरून इंग्रजांनी त्यांना तुरुंगात न ठेवता त्यांच्या घरीच नजरकैदेत ठेवले. नजरकैदेत असतानाच त्यांनी वेषांतर करुन पेशावर गाठले तेथून ते जर्मनीला गेले. जर्मनीत त्यांनी भारतीयांना इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रवृत्त केले. त्यांनी तेथील भारतीयांना संघटित केले. जर्मनीमध्ये ते एडॉल्फ हिटलरला भेटले. र्बलनिमध्ये त्यांनी आझाद हिंद रेडिओ व फ्री इंडिया सेंटरची स्थापना केली. १९४३ ला नेताजींना जपानवरून आमंत्रण आले. जर्मनीहून जपान व्हाया मादागास्कर असा सबमरीन प्रवास करीत ते जपानला पोहचले. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी त्यांनी सिंगापूर येथे आझाद हिंद सरकारची स्थापना केली. नेताजी स्वतः राष्ट्रप्रमुख, पंतप्रधान, संरक्षण मंत्री व सरसेनापती बनले. या राष्ट्राला जपान, जर्मनी, ब्रह्मदेश, इटली यासह ११ देशांनी मान्यता दिली. नेताजींनी तरुणांना आझाद हिंद सेनेत सहभागी होण्याचे आव्हान करीत तुम मुझे खून दो... मै तुम्हे आझादी दुंगा...अशी घोषणा केली. त्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत हजारो तरुण आझाद हिंद सेनेत सामील झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आझाद हिंद सेनेने जपानी लष्कराच्या साहाय्याने भारतावर आक्रमण केले. दोन्ही फौजांनी इंग्रजांकडून अंदमान निकोबार बेटे जिंकली. ब्रह्मदेशमधून आझाद हिंद सेनेच्या फौजा भारताकडे निघाल्या मात्र नैर्सगकि आपत्तीमुळे आझाद हिंद सेनेला माघार घ्यावी लागली. रंगून आकाशवाणी वरुन नेताजींनी भाषण करुन इंग्रजांशी कोणत्याही प्रकारचा समजोता न करण्याचे, फाळणी न करण्याचे लढा चालूच ठेवण्याचे आव्हान केले. महायुद्धात जर्मनी, इटली यांचा पराभव झाला. जपानने शरणागती पत्करली तेंव्हा नेताजींनी रशियाला जाण्याचा निर्णय घेतला. १८ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजी विमानातून माणचुरीयाच्या दिशेने जात होते. प्रवासादरम्यान त्यांचे विमान बेपत्ता झाले. २३ ऑगस्ट १९४५ रोजी जपानच्या दोनयी वृत्तसंस्थेने जगाला कळवले की १८ ऑगस्ट रोजी नेताजींच्या वमिानाला अपघात झाला त्यात नेताजींचे निधन झाले. १९९२ साली भारत सरकारने नेताजींना मरणोत्तर भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देण्याची घोषणा केली पण मृत्यूबाबत कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देणे अवैध आहे असे म्हणत त्यांच्या कुटुंबीयांनी हा पुरस्कार नाकारला. तुम मुझे खून दो... मै तुम्हे आझादी दुंगा... असा नारा देत भारतीयांमध्ये स्वातंत्र्य लढ्याची चेतना निर्माण करणाऱ्या नेताजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# श्री गणेश जयंतीचे महत्त्व

माघ शुद्ध चतुर्थी या दिवशी श्री गणेश लहरी प्रथम पृथ्वीवर अवतरल्या, म्हणून हा दिवस 'श्री गणेश जयंती' म्हणून साजरा केला जातो. इंग्रजी महिन्यानुसार यावर्षी २२ जानेवारी २०२६ रोजी श्री गणेश जयंती आहे. चतुर्थी तिथीला श्री गणेश तत्त्व अधिक कार्यरत असल्याने या दिवशी केलेली पूजा, आरती, स्तोत्रपठण व नामजप भक्ताला अधिक आध्यात्मिक लाभ देतात. हे झाले व्यष्टी साधनेचे प्रयत्न, याचचबरोबर देवतेची अधिकाधिक कृपा होण्यासाठी समष्टी साधना करणे ही महत्त्वाचे असते. समष्टी साधना होण्यासाठी काय करायचे तेही या लेखातून आपण समजून घेणार आहोत.

सनातन धर्मानुसार प्रत्येक देवता ही केवळ पूजेची प्रतिमा नसून ती एक चैतन्यमय, सूक्ष्म तत्त्व आहे. श्री गणेशाची उपासना म्हणजे बाह्य उत्सवापुरती मर्यादित कृती नसून, अंतःकरणातील विकार दूर करून विवेकबुद्धी जागृत करण्याची साधना आहे. श्री गणेश जयंतीच्या निमित्ताने श्री गणेश उपासनेचे शास्त्र, तसेच उत्सवाच्या नावाखाली कळत-नकळत होणारे देवतांचे विडंबन आणि ते रोखण्यासाठी आपण कोणती कृती करू शकतो, याचा विचार करणे आवश्यक आहे.

या दिवशी श्री गणपतीची पूजा कशी करावी?

प्रार्थना :

श्री गणेश जयंतीची अधिक लाभ होण्यासाठी पूजेच्या प्रारंभी मन एकाग्र करून नम्र भावाने प्रार्थना करावी. ''हे श्री गजानना, या पूजाविधीद्वारे माझ्या अंतःकरणात तुझ्याप्रती शुद्ध भक्तीभाव निर्माण होऊ दे. या पूजेतून प्रक्षेपित होणारे चैतन्य तुझ्या कृपेने मला अधिकाधिक ग्रहण करता येऊ दे.''

हळद, कुंकू, गंध अर्पण करण्यामागील शास्त्र:

श्री गणेशाला अनामिकेने गंध लावावे. श्री गणेशाच्या आज्ञा चक्राच्या स्पर्शाने आपल्या मनातील खळबळ स्थिरावली असून आपले मन शांत झाले आहे असा भाव ठेवावा. तसेच अंगठा व अनामिका यांच्या चिमटीत प्रथम हळद आणि नंतर कुंकू घेऊन श्री गणेशाच्या चरणावर अर्पण करावे. या मुद्रेमुळे पूजकात भक्तिभाव जागृत होतो.

फुले आणि दुर्वा अर्पण करणे :

भाव तेथे देव अशी आपल्याकडे म्हण आहे. कोणत्याही देवतेची उपासना करतांना भाव महत्त्वाचा आहे. हे लक्षात घेऊन प्रत्येक कृती भावपूर्ण करणे महत्त्वाचे आहे. श्रीगणेशाला लाल जास्वंद वा अन्य लाल फुले शंकरपाळ्याच्या रचनेत वहावी. फ



उदबत्ती व अत्तर अर्पण करतांना भाव कसा असावा :

श्री गणेश पूजनात चंदन, केवडा किंवा चमेली गंधाची उदबत्ती असावी. त्या सुगंधात आपले विकार नष्ट होत आहेत, आणि आपल्यात श्री गणेशाचे गुण निर्माण होत आहेत असा भाव असावा. तसेच श्री गणेशाला हीना गंधाचे अत्तर अर्पण करावे. अत्तराच्या सुगंधाने मनाची प्रसन्नता अनुभवावी.

आरती, नामजप केल्याने होणारे आध्यात्मिक लाभ :

श्रीसमर्थ रामदासस्वामी लिखित चैतन्यमय 'सुखकर्ता दुःखहर्ता' ही आरती म्हणताना प्रत्येक ओळ अंतर्मनापासून म्हणजे आर्ततेने

...ील प्रत्येक
...ाय नमः''
...क करावा.
...अनावश्यक
...भर उत्साह
...तो.

...ना म्हणून
...ाता समष्टी
...कतो, तेही
...आहे. त्यात
...मंदिरामध्ये

श्री गणेश जयंतीला फुग्याची आरास आणि केक कापून त्याचा प्रसाद वितरण, गणेश जयंतीच्या मिरवणुकीत डिजे () लावणे यांसारख्या कृती बघायला मिळतात. यामुळे सात्त्विकता व चैतन्य कमी होऊन रज-तमाचे प्रमाण वाढते. देवतांचे विडंबन होते. मंदिरे ही चैतन्याची केंद्रे असल्याने तेथील वातावरण सात्त्विकच असायला हवे.

देवतांचे विडंबन होऊ नये यासाठी पुढील कृती कराव्या :

दैनंदिन वापरातील वस्तू जसे कपडे, पर्स, मुलांचे शाळेचे डब्बे, खेळणी, पाण्याची बाटली इत्यादींवर देवतांची चित्रे टाळावीत. या वस्तूंचा वापर झाल्यावर आपण त्या कुठेही ठेवतो. त्यामुळे देवतेची विडंबना होते. असे होऊ नये म्हणून आपण स्वतः योग्य कृती करावी आणि इतरांचे प्रबोधन करावे. उत्सवाचे आणि मंदिराचे पावित्र्य राखण्यासाठी मंदिरांनी सात्विक आणि जनप्रबोधन करणारे, राष्ट्र आणि धर्म जागृती करणारे कार्यक्रम आयोजित करावे.

अशा विविध माध्यमातून श्री गणेशाची कृपा संपादन करावी. शास्त्र समजून घेऊन, भक्तिभावाने केलेल्या पूजनात नक्कीच आनंद अनुभवता येतो आणि ईश्वराची कृपा संपादन करण्यास मदत होते. चला तर यंदाची गणेश जयंती भक्तीसागरात साजरी करूया.

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'गणपती'**

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**

**संपर्क- ९२८४०२७१८०**

# अहिल्यानगर येथील गुरुद्वारा भाई दया सिंगजी शीख इतिहासातील झफरनामा या महत्त्वपूर्ण अध्यायाचा साक्षीदार!

**अहिल्यानगर । प्रतिनिधी -** नांदेड येथे हिंद की चादर श्री गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या पावन स्मृती पर्वाच्या ऐतिहासिक सोहळ्याची जय्यत तयारी सुरू असतानाच, महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशात मोलाची भर घालणाऱ्या अहिल्यानगर शहराला लाभलेल्या शीख इतिहासाच्या एका अत्यंत महत्त्वपूर्ण पर्वावर प्रकाश टाकणे क्रमप्राप्त ठरते. गोविंदपुरा येथील गुरुद्वारा भाई दया सिंगजी हे स्थान शीख इतिहासातील झफरनामा या निर्णायक घटनेचा थेट साक्षीदार मानले जाते.

इतिहासाच्या पानांवर कोरलेली ही महत्त्वपूर्ण घटना १८ व्या शतकाच्या सुरुवातीची (सन १७०५-०६) आहे. शीख धर्माचे दहावे गुरु, श्री गुरु गोविंदसिंगजी महाराज यांनी स्वतःच्या वडिलांचे व पुत्रांचे मारेकरी ठरलेल्या तत्कालीन मुघल बादशहा औरंगजेब याला एक अत्यंत महत्त्वपूर्ण पत्र पाठविले होते, जे इतिहासात झफरनामा (विजयाचे पत्र) म्हणून ओळखले जाते. हे ऐतिहासिक पत्र औरंगजेबापर्यंत पोहोचविण्याची अत्यंत महत्त्वाची व जोखमीची जबाबदारी गुरु गोविंदसिंगजींनी पंच प्याऱ्यां पैकी एक असलेल्या भाई दया सिंगजी यांच्यावर सोपविली होती.

या ऐतिहासिक घटनेचे धागेदोरे थेट अहिल्यानगर शहराशी जोडलेले आहेत. श्री गुरु गोविंदसिंगजी महाराजांनी बादशहा औरंगजेबापर्यंत झफरनामा पोहोचविण्यासाठी भाई दया सिंगजी यांना पाठविले. भाई दया सिंगजी प्रथम औरंगाबाद येथे आले. तेथे त्यांना समजले की औरंगजेब हा अहमदनगरजवळील आलमगीर येथे आहे. त्यानुसार भाई दया सिंगजी अहमदनगर येथे आले; मात्र त्या वेळी त्यांना औरंगजेबाची भेट होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांनी संभाजीनगर (औरंगाबाद) येथील धवणी महल्ला येथे मुक्काम करून प्रयत्न सुरू ठेवले.

सुमारे तीन ते चार महिने सातत्याने प्रयत्न केल्यानंतर अखेर भाई दया सिंगजींना अहिल्यानगर येथे खुले दरबारात औरंगजेबाची भेट मिळाली व त्यांनी झफरनामा त्याच्यासमोर सादर केला. त्या काळी औरंगजेब अहमदनगरच्या भिंगार भागात छावणीत होता. त्या छावणीच्या बाहेरील मर्यादेत असलेल्या सध्याच्या गोविंदपुरा परिसरात (अहिल्यानगर) भाई दया सिंगजी, औरंगजेबाची भेट मिळावी व झफरनामा सादर करता यावा यासाठी थांबले होते.

याच पवित्र भूमीवर, जी भाई दया सिंगजींच्या चरणांनी पावन झाली आहे, त्या जागेचा विकास अहिल्यानगर येथील शीख समाजाने श्रद्धेने व स्वखर्चाने करून आज ती जागा ''गुरुद्वारा भाई दया सिंगजी साहिब, गोविंदपुरा, अहिल्यानगर'' म्हणून ओळखली जाते.

गुरु गोविंदसिंगजींनी हे पत्र मूळ पर्शियन (फारसी) भाषेत लिहिले असून त्यात एकूण १११ कडवी (शेर) आहेत.झफरनामा म्हणजे केवळ एक पत्र नसून ती अन्यायाविरुद्ध पुकारलेली नैतिक विजयाची ललकारी होती. या पत्रात गुरूजींनी चमकौरचे युद्ध, आपल्या पुत्रांचे बलिदान व औरंगजेबाच्या सैन्याने पवित्र कुराण पाठवुन दिलेले शब्द न पाळता केलेला विश्वासघात, यावर कठोर शब्दांत ताशेरे ओढले आहेत. याच पत्रात शीख इतिहासातील प्रसिद्ध ओळ नमूद आहे - कुन् कर अझ हमेह् हील-ते दार गुज़श्त, हलाल अस्त बुर्दन बा शमशेर दस्त ।।२२।।

जब अन्याय के खिलाफ सभी प्रयास किये गये हो, न्याय का मार्ग अवरुद्ध हो, तब तलवार उठाना सही है'' (जेव्हा अन्यायाचा प्रतिकार करण्याचे शांततेचे सर्व मार्ग बंद होतात, तेव्हा हाती तलवार घेणे हेच उचित व धर्मसंमत ठरते). विशेष म्हणजे, भाई दया सिंगजींनी हे पत्र दिल्यावर खुद्द औरंगजेबाने त्याचा सकारात्मक स्वीकार केला होता व गुरूजींना सन्मानाने भेटीसाठी आमंत्रित करणारे शाही पत्र जारी केले होते, अशी साक्ष येथील इतिहास देतो.

भाई दया सिंगजींच्या चरणस्पर्शाने पावन झालेली ही भूमी शीख समाजासाठी अत्यंत पवित्र असून, ती एका ऐतिहासिक पर्वाची साक्ष देत उभी आहे. हे स्थान केवळ धार्मिक श्रद्धेचे केंद्र नसून, भारतीय इतिहासातील एका महत्त्वाच्या कालखंडाचे व गुरु गोविंदसिंगजींच्या सर्वोच्च नीतिमत्तेचे प्रतीक आहे. हा अमूल्य ऐतिहासिक वारसा भावी पिढ्यांसाठी नक्कीच प्रेरणास्त्रोत ठरेल.

# स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानाचे आयोजन; जालना जिल्ह्यात ३० जानेवारीपासून शोध मोहीम

**जालना । प्रतिनिधी -** केंद्र शासनाने सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरोग प्रसार हे उद्दिष्ट निश्चित केले आहे. हे साध्य करण्यासाठी मा. सहसंचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे यांच्या आदेशान्वये, जालना जिल्ह्यात ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान आणि कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) शोध मोहीम राबवण्यात येणार आहे.

काय आहे अभियानाचे स्वरूप?

या मोहिमेअंतर्गत आशा स्वयंसेविका आणि पुरुष स्वयंसेवक यांच्या पथकाद्वारे जिल्ह्यातील अति जोखमीच्या भागांत सर्वेक्षण केले जाईल. समाजातील लपलेले कुष्ठरुग्ण शोधून त्यांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली () आणणे हा या मोहिमेचा मुख्य हेतू आहे. तसेच, कुष्ठरुग्णांच्या निकट सहवासितांना रिफॅम्पिसीन या गोळीचा एकल डोस देऊन संसर्गापासून सुरक्षित केले जाणार आहे.

कुष्ठरोगाची लक्षणे व उपचार

आरोग्य विभागाने नागरिकांना खालील लक्षणे आढळल्यास त्वरित सरकारी रुग्णालयात तपासणी करण्याचे आवाहन केले आहे:

त्वचेवर लालसर किंवा फिकट रंगाचा, न खाजणारा व बधीर चट्टा असणे.

त्वचा तेलकट होणे किंवा त्वचेवर गाठी येणे.

कानाच्या पाळ्या जाड होणे.

हाता-पायाची बोटे वाकडी होणे किंवा स्पर्श संवेदना कमी होणे.



महत्त्वाची माहिती: कुष्ठरोग हा शाप नसून जिवाणूंमुळे होणारा आजार आहे. तो अनुवांशिक नाही. सरकारी रुग्णालयांमध्ये याचे निदान आणि उपचार पूर्णपणे मोफत उपलब्ध आहेत.

विशेष ग्रामसभा व प्रतिज्ञा

भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून २६ जानेवारी रोजी जिल्ह्यातील विशेष ग्रामसभांमध्ये कुष्ठरोग निर्मूलनाची प्रतिज्ञा घेतली जाईल. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी नागरिकांना केलेल्या आवाहनाचे वाचन करण्यात येईल. भेदभाव समाप्त करूया, सन्मानाची वागणूक देऊया हे या वर्षाचे मुख्य ब्रीदवाक्य आहे.

जालना जिल्ह्याची सद्यस्थिती

सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. सुधाकर शेळके यांनी दिलेल्या माहितीनुसार, एप्रिल २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत जिल्ह्यात १४३ नवीन रुग्ण आढळले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. आगामी कुसुम मोहिमेत स्थलांतरित मजूर, वीटभट्टी कामगार, आश्रमशाळा आणि कारागृहातील कैदी यांच्या तपासणीवर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

''कुष्ठरोग पूर्णपणे बरा होऊ शकतो. वेळेवर निदान झाल्यास अपंगत्व टाळता येते. नागरिकांनी तपासणीसाठी पथकाला सहकार्य करावे आणि कुष्ठरुग्णांना सन्मानाची वागणूक द्यावी.''

**डॉ. सुधाकर शेळके,**

**सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग), जालना.**

# कोणतेही स्वप्न कठीण नाही, तयारी पाहिजे - महेश सावंत

## फणसगाव महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिरात प्रतिपादन

**तळेरे । प्रतिनिधी -** असे अधिकारी बना की ज्यामुळे तुम्हाला अभिमान वाटेलच पण, तुमच्या आई वडिलांना, गुरुंना आणि संपूर्ण गावाला अभिमान वाटला पाहिजे. असे स्वप्न घेऊन जगायचे असते आणि त्यासाठी प्रचंड मेहनत आणि प्रामाणिक प्रयत्न करा. कोणतेही स्वप्न कठीण नाही, त्यासाठी तुमची तयारी असली पाहिजे, असे प्रतिपादन ध्रुव अॅकॅडमीचे संचालक महेश सावंत यांनी केले. ते फणसगाव कला व वाणिज्य म हाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिरातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सत्रात बोलत होते. हे शिबिर जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा उंडिल नं.१ येथे आयोजित करण्यात आले आहे. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीप नारकर, फणसगाव पंचक्रोशी शिक्षण संस्थेचे प्रमुख कार्यवाह संदेश नारकर, प्रसिध्द व्यावसायिक राजेंद्र नरसाळे, जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, सरपंच प्रियंका सरवणकर, महात्मा गांधी तंटामुक्ती समिती अध्यक्ष कृष्णा नर, महाविद्यालयाच्या प्राचार्य अनुश्री नारकर, अक्षरोत्सव प्रमुख निकेत पावसकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरादरम्यान मुलांना विविध व्याख्याने आणि प्रत्यक्षिकाद्वारे लोकशाही नेतृत्व, व्यक्तिमत्व विकास, सामाजिक जाणीव, स्वयंरोजगार व पर्यावरण संवर्धन, स्वच्छता - आरोग्य विषयी जनजागृती अशा विविध गुणांची रुजवात केली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीप नारकर म्हणाले की, ध्येय निश्चित केल्याशिवाय ध्येयासाठीचे प्रयत्न योग्य दिशेने होत नाहीत. त्यासाठी सर्वप्रथम प्रत्येकाने आपले ध्येय निश्चित करा. त्यासोबतच नियमित वर्तमानपत्र वाचलेच पाहिजे. कारण, वर्तम ानपत्र वाचन हे ज्ञानाचे भांडार आहे, त्याचा योग्य वापर करा, यश तुमचेच आहे. यावेळी गुरुनाथ तिरपणकर, संदेश नारकर, राजेंद्र नरसाळे, प्रियांका सरवणकर यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुचिता चव्हाण तर आभार प्रा. ज्योत्स्ना कदम यांनी मानले.

# कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय बैठक

**जालना । प्रतिनिधी -** म्हणून झालेले श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या



व्या शहिदी वर्षानिमित्त नांदेड येथे व जानेवारी, होणाऱ्या भव्य कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्ह्यात येणाऱ्या विविध कार्यक्रम व जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सविस्तर आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशिमा मुख्य कार्यकारी अधिकारी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा अधिकारी यांच्यासह उपविभागीय गट विकास मुख्याधिकारी आदींची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी धर्म मानवी आणि जे ती आजच्या काळात आहेत. त्यामुळे त्यांच्या नव्या ही केवळ जबाबदारी नसून, आपले सामाजिक व प्रशासकीय कर्तव्य आहे. कार्यक्रमासाठी जालना जिल्हा प्रशासनाकडून आरोग्य वाहतूक व्यवस्था आणि आदींची मदत करण्यासाठी प्रत्येक नियोजन करावे. तसेच आरोग्य तपासणी नियोजन आणि सामाजिक यामध्ये सहभागी करुन घ्यावे. हा ऐतिहासिक सोहळा यशस्वी या सर्व शासकीय संस्था व सामाजिक यासाठी काम करणे आवश्यक आहे. तसेच जिल्ह्यातून सहभागी होणारे भाविक, प्रतिनिधी व आवश्यक मार्गदर्शन व समन्वय उपलब्ध करून संबंधित यंत्रणांनी असे निर्देश त्यांनी दिले.

‘हिंद दी चादर’निमित्त कार्यक्रमाच्या अनुषंगाने पूर्वतयारी

## श्री गुरु तेग बहादूर जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे भव्य सोहळ्याचे आयोजन

जालना । ‘हिंद दी चादर’ श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी, २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास देश-विदेशातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, या कार्यक्रमास जालना जिल्ह्यातील भाविकांना नागरिकांना उपस्थित राहता यावे यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात यावी. या महासोहळ्यात शीख, सिकलीगर, बंजारा,लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन आणि वारकरी संप्रदायातील भगत नामदेव समाज आदी समाजासह इतर समाजातील सुमारे ९ ते १० लाख भाविक सहभागी होणार आहेत. त्यामुळे या कार्यक्रमास विविध सामाजिक संस्था, आणि सीएसआरच्या माध्यमातून आपल्या जिल्ह्यातून शक्य तेवढी मदत पोहचविण्याचे नियोजन जिल्हा प्रशासन आणि समाज घटकांमार्फत करण्यात येणार असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयात नांदेड येथे २४ व २५ जानेवारी, २०२६ रोजी आयोजित होणाऱ्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित पूर्वतयारीच्या आढावा बैठकीत श्रीमती मित्तल बोलत होत्या. यावेळी बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल, शिक्षणाधिकारी बी. आर. खरात, जिल्हा समाज कल्याण अधिकारी लिंबाजी बारगिरे, जिल्हा क्रिडा अधिकारी नरेंद्र पवार, मनोज उकिर्डे, ङ विनोद राठोड, श्री. कमलेशजी, उध्दव पवार, गुरविंदर सिंग, गुरुदिप सिंग बंड, रण सिंग संधू, गणेश राठोड, अर्जून राठोड, श्रीकांत राठोड, राजेश जांगडे, हितेश जोशी यांची उपस्थिती होती. श्री गुरू तेग बहादूर जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त महाराष्ट्र शासन आणि हिंदी दी चादर श्री गुरू तेग बहादूर जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे दि. २४ व २५ जानेवारी, २०२६ रोजी आयोजित ‘हिंद दी चादर’ या कार्यक्रमास देश-विदेशातील भाविकांसाठी रेल्वे आणि बसेसचे नियोजन करण्यात येणार आहे.

# निळवंडीचा पत्रकार सन्मान सोहळा कौतुकास्पद -नगरसेवक नितीन गांगुर्डे

**दिंडोरी । प्रतिनिधी -** निळवंडी ग्रामपंचायत, जय कानिफनाथ पाणीवापर संस्था व ग्रामस्थांच्या वतीने पत्रकारदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला पत्रकार सन्मान सोहळा प्रेरणादायी, उत्साहवर्धक व संस्मरणीय ठरला, असे प्रतिपादन दिंडोरी नगरपंचायतचे नगरसेवक तथा पत्रकार नितीन गांगुर्डे यांनी केले.

निळवंडी ग्रामपंचायत, जय कानिफनाथ पाणी वापर संस्था व समस्त ग्रामस्थांच्या वतीने तालुका प्रतिनिधी पत्रकारांचा सन्मान सोहळ्याप्रसंगी नगरसेवक नितीन गांगुर्डे बोलत होते. यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती कैलास पाटील, पोलिस पाटील अंबादास पाटील, माजी सैनिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मेजर भारत खांदवे, जय कानिफनाथ पाणीवापर संस्थेचे चेअरमन सुनील पाटील, माजी उपसरपंच भाऊसाहेब पाटील, सरपंच मनिषा चारोस्कर, उपसरपंच शंकर पाटील आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते. नगरसेवक नितीन गांगुर्डे पुढे म्हणाले की, दिंडोरी तालुक्यात अनेक ग्रामपंचायती असल्या तरी सलग पाचव्या वर्षी पत्रकार सन्मानाचा उपक्रम राबविणारी निळवंडी ही एकमेव ग्राम पंचायत असून इतर ग्रामपंचायतींनी या उपक्रमाचा आदर्श घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून समाजातील सत्य परिस्थिती निर्भीडपणे मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ते करतात. ग्रामीण भागातील प्रश्न व सर्वसामान्यांचे दुःख शासनापर्यंत पोहोचविण्याचे कार्य पत्रकारांमुळेच शक्य होते, असे मत यावेळी नगरसेवक तथा पत्रकार नितीन गांगुर्डे यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी पत्रकार नितीन गांगुर्डे विलास ढाकणे, संतोष कथार, भगवान गायकवाड, अशोक निकम, बापू चव्हाण, बाळासाहेब अस्वले, अशोक केंग, सुनील जाधव, संतोष निकम, मनोज पाटील, पोपट गवारी आदी पत्रकारांचा शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प, डायरी व पेन देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात कैलास पाटील, गणेश हिरे व सोमनाथ पताडे यांनी पत्रकारांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पत्रकारांच्या वतीने संतोष कथार, भगवान गायकवाड, बापू चव्हाण व संतोष निकम यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामपंचायत अधिकारी रवींद्र पवार यांनी केले तर आभार क्लार्क अनिल पाटील यांनी मानले. यानंतर सर्व पत्रकारांनी जय कानिफनाथ पाणीवापर संस्थेच्या कार्यालयास सदिच्छा भेट देऊन संस्थेच्या कामकाजाची माहिती घेतली. संस्थेच्या वतीनेही पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. तसेच भारतीय लष्कर दिनानिमित्त माजी सैनिक मेजर भारत खांदवे यांचा ग्रामपंचायत, जय कानिफनाथ पाणीवापर संस्था, ग्रामस्थ व पत्रकारांच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास गणेश हिरे, अनिल चारोस्कर, कचरु पवार, विश्वनाथ पाटील, सोमनाथ पताडे, पोपटबाबा पाटील, एकनाथ डंबाळे, मधुकर पवार, आत्माराम पाटील, भाऊसाहेब वाघ, भाऊसाहेब गवारी, विजय पाटील, माणिक पताडे, साईराम बोंबले, साहेबराव चारोस्कर, प्रकाश गवारे, साहेबराव पाटील, विष्णू पाटील, नंदु पाटील, झुंबर पाटील, पुंडलिक चारोस्कर, माधव चारोस्कर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# फणसगाव महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि उद्योग निर्मिती मार्गदर्शन शिबिर संपन्न

**देवगड । प्रतिनिधी -** देवगड तालुक्यातील फणसगाव येथील महाविद्यालयात दिनांक ८ जानेवारी रोजी यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग या क्षेत्रातील संधीबद्दल , विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन तसेच कोकणात उद्योजक निर्माण करण्याच्या उद्देशाने उद्योजक निर्मिती मार्गदर्शन शिबिर संपन्न झाले . या शिबिराला महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला

प्रमुख मार्गदर्शक,कोकणचे सुपुत्र, आणि अनेक अधिकारी घडवणारे बदलापूर येथील ध्रुव अॅकॅडमी चे संस्थापक संचालक श्री महेश सावंत यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना सरकारी नोकरी मिळवण्यासाठी असणाऱ्या विविध संधीची माहिती दिली . उच्च सरकारी अधिकारी होण्यासाठी यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग सारख्या परीक्षांसाठी शालेय स्तरापासूनच प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले . विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्न बघणे आवश्यक आहे आणि त्यासाठी दीर्घ मेहनत, संयम आणि सोबत योग्य मार्गदर्शनाची जोड असणे आवश्यक असते. परिस्थितीशी संघर्ष करून अनेकांनी नेत्रदीपक यश मिळवले आहे. त्यांचा आदर्श समोर ठेवून सकारात्मक प्रयत्न करा, यश मिळतेच असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांसाठी फणसगाव महाविद्यालयाने राबविलेल्या या विशेष उपक्रमाचे त्यांनी याप्रसंगी कौतुक केले .

मुंबईतील उद्योजक आणि फणसगावचे सुपुत्र श्री राजेंद्र नरसाळे यांनी उच्च अधिकारी घडवणे जसे आवश्यक आहे तसेच यशस्वी उद्योजक घडवणे ही आवश्यक आहे आणि यासाठीच विद्यार्थ्यांना उद्योजक , व्यावसायिक होण्याचे आवाहन त्यांनी केले . याप्रसंगी बोलताना , उद्योजक किंवा व्यावसायिक होण्यासाठी कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो आणि त्यावर कशाप्रकारे मात करता येईल, त्याचप्रमाणे विशेषतः कोकणात उद्योग व्यवसाय करण्याच्या विविध संधी याबद्दल त्यांनी विस्तृत माहिती दिली. ज्यांना आपण परप्रांतीय म्हणतो ते जर कोकणात येऊन यशस्वी होत असतील,तर आपण का नाही होणार? याचा प्रत्येकाने विचार करायला हवा असे प्रतिपादन त्यांनी केले . कोकणात उद्योजक घडवणे ही काळाची गरज आहे आणि भविष्यात आपल्यापैकी कोणालाही उद्योग व्यवसाय चालू करायचा असेल तर त्यांना आम्ही नक्कीच मार्गदर्शन आणि मदत करू असे आश्वासन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिले.

संस्थेचे सचिव श्री संदेश नारकर यांनी याप्रसंगी संस्थेकडून केल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली . अत्यंत ग्रामीण भागात , प्रतिकूल परिस्थितीत संस्थेने मोठी भरारी घेतली आहे . विद्यार्थ्यांना भविष्याच्या विविध संधींची माहिती देण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे असे आश्वासन त्यांनी दिले .

याप्रसंगी अध्यक्षीय भाषणात, राष्ट्रपती पदक विजेते व फणसगावचे सुपुत्र श्री दिलीप नारकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले .आमच्या माध्यमातून अनेक वेगवेगळ्या संधी मुलांना उपलब्ध करून दिल्या जातील , तसेच संस्थेला आमचे संपूर्ण सहकार्य व पाठिंबा मिळेल , फक्त विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा उचलून आपल्या गावाचे व समाजाचे नाव उज्वल करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली .

याप्रसंगी उपस्थित असलेल्या शाळेच्या माजी विद्यार्थिनी सौ. श्रावणी मदभावे यांनी पालकांना आवाहन करताना , लहानपणापासूनच विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक मानसिकता घडवण्यासाठी शाळेने व पालकांनी प्रयत्न करायला हवे असे मत व्यक्त केले. त्यासाठी कोणत्याही प्रकारची मदत आवश्यक असल्यास पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले .

संस्थेचे प्राचार्य श्री पाटील सर यांनी याप्रसंगी मार्गदर्शकांचे आभार मानताना अशा प्रकारचे मार्गदर्शन करणारे उपक्रम यापुढेही आम्ही आयोजित करू असे ग्रामस्थांना आश्वासन दिले.

ज्येष्ठ पत्रकार श्री गुरुनाथ तिरपणकर यांनीही याप्रसंगी शाळेच्या सदर उपक्रमाचे कौतुक करताना अशा सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांसाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले .

या कार्यक्रमासाठी उंडील गावच्या सरपंच सौ. सरवनकर , राष्ट्रपती पुरस्कार विजेते श्री. दिलीप नारकर - ,संस्थेचे सचिव श्री. संदेश नारकर , श्री. राहुल चव्हाण- सदस्य , प्रोफेसर जानवी नारकर ,माजी विद्यार्थिनी श्रावणी मदभावे , उदय दूधवाडकर, अध्यक्ष -तरळे पंचक्रोशी पत्रकार संघ, भाई नारकर , श्री बाळा नर - तंटामुक्ती समिती प्रमुख इत्यादी मान्यवर उपस्थित होते.






जालना शहरातील मुख्य बाजारपेठ मध्ये असलेले अंबिका मार्केटची जीर्ण इमारत पाडण्याचे आदेश शासनाने जारी केले आहे

# २२ जानेवारी रोजी कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालयात बोलींचा जागर कार्यक्रमाचे आयोजन

**परभणी । प्रतिनिधी -** मराठी भाषा विभाग , मंत्रालय मुंबई.भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य. मराठी विभाग ,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या निमित्त परभणी जिल्ह्यातील बोलींचा जागर या विशेष कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार , २२ जानेवारी २०२६ रोजी कमलताई जामकर सांस्कृतिक सभागृह,कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय, जिंतूर रोड , परभणी येथे सकाळी ९ ते दुपारी १ वाजे दरम्यान करण्यात आले आहे.

सदरील कार्यक्रमाचे उदघाटन हेमंतराव जामकर,( अध्यक्ष, नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था,परभणी .) यांचे हस्ते होणार असून डॉ.पृथ्वीराज तौर ( सदस्य ,मराठी भाषा सल्लागार समिती महाराष्ट्र शासन , मराठी विभाग प्रमुख, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड ), विजयसिंह जामकर ( सचिव, नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था,परभणी ) प्रमुख पाहुणे तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रामचंद्र भिसे यांची उपस्थिती असणार आहे.

बोलींचा जागर कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालया पासून सकाळी ९ वाजता ग्रंथ दिंडी , शोभायात्रेने करण्यात येणार आहे.यात पारंपरिक वेशभूषा करत कलावंत आणि सदगुरु बालासाहेब पौळ महाराज भजनी मंडळ बोलींचा जागर करणार आहेत.

दुसऱ्या सत्रात मुलतानी बोली विषयी प्रा.स्वाती काटे , तर कैकाडी बोली विषयी प्रा.डॉ.सुरेश कदम आपले अभ्यासपूर्ण विचार मांडणार आहेत.

या कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने होणार असून पोवाडा ,लोकगीत ,गोंधळ ,

भारूड ,तुमडी गीत ,धनगरी गीत ,लोकवाद्य वृंद आदी

लोककला प्रकाराचे सादरीकरण शाहिर प्रा.डॉ.शिवराज शिंदे नांदेड ,प्रा.डॉ.रविंद्र इंगळे,प्रा.डॉ.पल्लवी कुलकर्णी,रवि सोनवणे आणि संच कै. सौ.कजाम महाविद्यालय परभणी,माऊली पाथरकर आणि संच कै.रावसाहेब जामकर माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालय,परभणी करणार आहेत.

बोलींचा जागर कार्यक्रमाचे निमंत्रक डॉ.उदय सामंत (मा.मंत्री, मराठी भाषा व उद्योग,मंत्रालय मुंबई,महाराष्ट्र राज्य. ) डॉ.किरण कुलकर्णी ( सचिव, मराठी भाषा विभाग,मंत्रालय, मुंबई. )

विनित, अरुण गीते ,(भाषा संचालक,भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य.) यांचे मार्गदर्शना खाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे यशस्वीते साठी आयोजक प्राचार्य , डॉ.रामचंद्र भिसे यांचे मार्गदर्शना खाली समन्वयक मराठी विभाग प्रमुख प्रा.अरुण पडघन , प्रा.डॉ. आशा गीरी ,सर्व प्राध्यापक ,कर्मचारी कार्य करत आहेत .

सदरील कार्यक्रमा साठी परभणी जिल्ह्यातील कला, वाणिज्य, विज्ञान वरीष्ठ महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थी , विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवावा असे आवाहन आयोजक याचे वतीने करण्यात आले आहे.

# ‘हिंद-दी-चादर’ कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय बैठक संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** ‘हिंद-दी-चादर’ म्हणून इतिहासात अजरामर झालेले शीख धर्माचे गुरु, श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी स्मृती वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी, २०२६ होणाऱ्या भव्य कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रम व उपक्रमांचा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सविस्तर आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पी एम मिन्नू, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांच्यासह उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी, मुख्याधिकारी आदींची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी धर्म स्वातंत्र्य, मानवी हक्क, सहिष्णुता आणि आत्मबलिदानाचे जे मूल्य समाजाला दिले, ती मूल्ये आजच्या काळात अधिकच प्रेरणादायी आहेत. त्यामुळे त्यांच्या जीवनकार्याचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही केवळ धार्मिक जबाबदारी नसून, आपले सामाजिक व प्रशासकीय कर्तव्य आहे. हिंद-दी-चादर कार्यक्रमासाठी जालना जिल्हा प्रशासनाकडून आरोग्य सेवा, वाहतूक व्यवस्था आणि स्वयंसेवक आदींची मदत करण्यासाठी प्रत्येक तालूकास्तरावर नियोजन करावे. तसेच आरोग्य तपासणी शिबिरे, जनजागृती, वाहतुकीचे नियोजन आणि सामाजिक संस्थांना यामध्ये सहभागी करुन घ्यावे. जेणेकरून हा ऐतिहासिक सोहळा यशस्वी होईल या दृष्टीने सर्व शासकीय विभाग, शैक्षणिक संस्था व सामाजिक घटकांनी एकत्रितपणे यासाठी काम करणे आवश्यक आहे. तसेच जिल्ह्यातून सहभागी होणारे भाविक, प्रतिनिधी व विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा, मार्गदर्शन व समन्वय उपलब्ध करून देण्यासाठी परिवहन विभागासह संबंधित यंत्रणांनी पूर्वतयारी करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

## परतूर शहर मोहिम अभियानाचा तिसरा दिवस

# स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबवण्याच्या भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या सूचना

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहरात साठलेली घाण, दुर्गंधी, यामुळे परतूर शहरातील नागरिकांची प्रचंड मोठी अडचण निर्माण झाली होती या पार्श्वभूमीवर माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी घोषणा केल्याप्रमाणे, भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी संपूर्ण शहर स्वच्छता मोहिमेवर आपली लक्ष केंद्रित केलेले असून गेल्या तीन दिवसापासून प्रभाग क्रमांक ०१ मध्ये स्वच्छतेची मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे



या पार्श्वभूमीवर आज नगराध्यक्ष शहाजी राक्षे न प चे मुख्य अधिकारी दीपक इंगोले, शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर, गटनेते प्रकाश चव्हाण, नगरसेवक इजरान कुरेशी सतीश सोनवणे सावता काळे सोनू अग्रवाल यांनी सुरू असलेल्या शहर स्वच्छता मोहिमेची भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या आदेशावरून पाहणी केली व मोहीम वेगाने पुढे नेण्याच्या सूचना स्वच्छता अधिकाऱ्यांना करण्यात आल्या

या संदर्भामध्ये भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर म्हणाले की, संपूर्ण परतुर शहराची स्वच्छता करून नियमितपणे परतूर शहर स्वच्छ असले पाहिजे यासाठीचा आपला सततचा प्रयत्न राहणार असून आपण सातत्याने स्वच्छतेबरोबरच इतर नागरी समस्यांच्या बाबतीत संपूर्णपणे नगरपरिषदेच्या कारभारावर लक्ष केंद्रित करणार असून परतुर शहराचा चेहरा बदलणार असून, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी परतूरकरांसाठी जे निधी देण्याच्या आश्वासन दिले आहे त्याचा प्रस्ताव तयार करण्याचे काम सध्या चालू असून लवकरच हा प्रस्ताव घेऊन आम्ही माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांकडे हा प्रस्ताव घेऊन जाणार आहोत असेही त्यांनी म्हटले आहे

**स्वच्छता मोहिमेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी यंत्रणा वाढविण्याच्या मुख्य अधिकाऱ्यांना सूचना**☼ शहरातील स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबवली जावी यासाठी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी नगराध्यक्षांसह मुख्य अधिकारी यांना सूचना करत, मोहिमेला तीव्र गती देण्यासाठी यंत्रणा वाढवून कामे जलदगतीने पूर्ण करा अशा सूचना देत त्या त्या प्रभागातील नागरिकांचे अभिप्राय दररोज घेत आपल्यापर्यंत पोहचवा असे म्हटले आहे

या वेळी नगराध्यक्ष शहाजी राक्षे नगरपालिकेचे मुख्याधिकारी दीपक इंगोले भाजपा शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर गटनेते प्रकाश चव्हाण नगरसेवक इजरान कुरेशी नगरसेवक सावता काळे नगरसेवक सोनू अग्रवाल नगरसेवक सतीश सोनवणे संतोष हिवाळे नरेश कांबळे शहा नवाज कुरेशी आदींनी प्रभाग क्रमांक एक मध्ये सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेची पाहणी केली.

# जालन्यात एटीएसची मोठी कारवाई; गावठी पिस्तूल अन् जिवंत काडतुसासह सराईत गुन्हेगार जेरबंद

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात गुन्हेगारीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन सतर्क असतानाच, दहशतवाद विरोधी शाखेने () एका मोठी कारवाई केली आहे. भोकरदन रोडवरील हॉटेल आई अमृततुल्य परिसरात सापळा रचून एका २२ वर्षीय तरुणाला बेकायदेशीर अग्नीशस्त्र आणि जिवंत काडतुसासह अटक करण्यात आली आहे.

दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी रात्री ८:०० वाजेच्या सुमारास दहशतवाद विरोधी शाखेचे प्रभारी अधिकारी सपोनि सचिन इंगेवाड यांना विश्वसनीय सूत्रांकडून माहिती मिळाली की, विजय ऊर्फ दैन्या अशोक जाधव (वय २२ वर्ष, रा. ढवळेश्वर नगर, जालना) हा स्वतःकडे घातक पिस्तूल बाळगून फिरत आहे. या माहितीची गांभीर्याने दखल घेत पथकाने तात्काळ भोकरदन रोडवरील हॉटेल आई अमृततुल्य येथे सापळा रचला. संशयित आरोपी विजय ऊर्फ दैन्या हा घटनास्थळी येताच पोलिसांनी त्याला पंचासमक्ष ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या कमरेला एक गावठी पिस्तूल खोचलेले आढळले. तसेच त्याच्याकडील मोटारसायकलची तपासणी केली असता आणखी साहित्य मिळून आले.

**जप्त करण्यात आलेला मुद्देमालः** गावठी पिस्तूलः ३५,००० रुपये किमतीचे काळ्या रंगाची लोखंडी बॉडी असलेले मॅगझीनसह पिस्तूल. (मुठीवर स्टारचे चिन्ह असलेले).

जिवंत काडतूसः १,००० रुपये किमतीचे पितळी जिवंत काडतूस.

तलवार/पातेः ३,००० रुपये किमतीचे २ फूट १० इंच लांबीचे टोकदार पाते आणि लाकडी म्यान.

मोटारसायकलः ७०,००० रुपये किमतीची काळ्या रंगाची होंडा शाईन (क्रमांक नसलेली, पाठीमागे मोठ्या अक्षरात २ नंबर लिहिलेला).

एकूण जप्त मुद्देमालः १,०९,००० रुपये.

**चंदनझीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल** या प्रकरणी आरोपी विजय ऊर्फ दैन्या अशोक जाधव याच्याविरुद्ध पोलीस ठाणे चंदनझीरा येथे भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ३/२५ आणि ४/२५ प्रमाणे गुन्हा (गु.र.नं. २२/२०२६) दाखल करण्यात आला आहे. हे शस्त्र त्याने कोणाकडून आणले आणि त्याचा काय उद्देश होता, याचा तपास पोलीस करत आहेत.

**या पथकाने केली कारवाई** ही धडाकेबाज कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत सपोनि सचिन इंगेवाड, सपोउपनि ए.यु. शेख, पोहेकॉ मारुती शिवरकर, विनोद गडदे आणि चालक पोहेकॉ डी.व्ही. बडुरे यांनी सहभाग घेतला.

प्रशासनाचा इशाराः शहरात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांवर यापुढेही कडक कारवाई सुरूच राहणार असून, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींनी कायद्याचे उल्लंघन करू नये, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## जालन्यात दुचाकी चोरट्यांची टोळी गजाआड;

# चंदनझिरा पोलिसांची धडाकेबाज कारवाई, १४ पैकी ४ मोटारसायकल जप्त

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील औद्योगिक वसाहत () भागात वाढत्या दुचाकी चोऱ्यांमुळे नागरिक त्रस्त असतानाच, चंदनझिरा पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. एका गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिसांनी आंतरजिल्हा सक्रिय असलेल्या टोळीचा पर्दाफाश केला असून, ४ अट्टल चोरट्यांना अटक केली आहे. त्यांच्याकडून आतापर्यंत चोरीच्या ४ मोटारसायकल जप्त करण्यात आल्या असून, एकूण १४ दुचाकींच्या तपासाचे चक्र वेगाने फिरत आहे.

**नेमकी घटना काय?** दिनांक ९ जानेवारी २०२६ रोजी सिरसवाडी येथील रहिवासी भगवान तांगडे यांची हिरो एचएफ डिलक्स (क्र. -२१--१४६५) ही मोटारसायकल एमआयडीसीमधील गजकेसरी कंपनीच्या परिसरातून चोरीला गेली होती. याप्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. शहरात सातत्याने होणाऱ्या या चोऱ्यांमुळे पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी चोरट्यांना पकडण्याचे कडक निर्देश दिले होते.

**मध्यरात्री सापळा आणि अटक** चंदनझिरा पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथक कार्यरत असताना, १९ जानेवारीच्या मध्यरात्री गोपनीय माहिती मिळाली की, गजकेसरी कंपनीतून चोरी झालेली दुचाकी एक तरुण चालवत आहे. पोलिसांनी तातडीने सापळा रचून आकाश दादाराव साळवे (वय २२, रा. शास्त्री मोहल्ला, जालना) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चोरीची दुचाकी मिळून आली. **साथीदारांची नावे निष्पन्न** आकाश साळवेची सखोल चौकशी केली असता, त्याने या गुन्ह्यात त्याच्या तीन साथीदारांची नावे सांगितली. पोलिसांनी तातडीने हालचाली करत खालील आरोपींना बेड्या ठोकल्याः बालाजी संजय वाघ (वय २२, रा. डोकसाळ, ता. बदनापूर) अनिल किशोर मोरे (वय २०, रा. बोधलापुरी, ता. घनसावंगी) रितेश राजू शिंदे (वय २१, रा. डोकसाळ, ता. बदनापूर) दुचाकी जप्त; मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता

अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. कोठडी दरम्यान केलेल्या चौकशीत त्यांनी एमआयडीसी परिसरातून यापूर्वीही अनेक दुचाकी चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून आतापर्यंतः

हिरो होंडा स्प्लेंडर, बजाज सीटी १००

हिरो स्प्लेंडर प्लस, हिरो एचएफ डिलक्स

अशा एकूण २,००,००० रुपये किमतीच्या ४ मोटारसायकल जप्त केल्या आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या टोळीकडून आणखी १० ते १२ दुचाकी (एकूण १४) मिळण्याची शक्यता असून तपास सुरू आहे. **या पथकाने बजावली कामगिरी** ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार, सपोउपनि मनसुब वेताळ, पोहेकॉ प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, रवींद्र देशमुख, राजेंद्र पवार, अभिजित वायकोस आणि चालक शेजूळ यांनी केली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.